**जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली (पुरवठा)**
क्र.पुरवठा/कार्या-11/अका-राभादु/कावि- 578/2023
दिनांक- 14.09.2023

(पुरवठा शाखा)
जाहिरात
(दुसरी वेळ)

शासन निर्णय अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक राग्राप- 2022/प्र.क्र.19/ ग्रासं - 2 दिनांक 29 ऑगस्ट 2022 च्या शासन निर्णयाअन्वये गडचिरोली जिल्ह्यातील ग्राहक संरक्षण परीषदेवर खालील दर्शविलेल्या प्रवर्गातील अशासकिय सदस्यांची नियुक्ती करावयाची आहे. त्या करीता गडचिरोली जिल्ह्यातील पात्र व्यक्तीकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्रवर्ग | पदांची संख्या |
|---|---|---|
| 1 | जिल्हा परीषदेचे सदस्य | 2 |
| 2 | नगर परीषदांचे सदस्य | 2 |
| 3 | पंचायत समिती सदस्य | 2 |
| 4 | कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रतिनिधी | 2 |
| 5 | ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी | 10 |
| 6 | शाळा महाविद्यालयाचे प्रतिनीधी | 2 |
| 7 | वैद्यकीय व्यवसायाचे प्रतिनिधी | 2 |
| 8 | व्यापार व उद्योग क्षेत्रांचे प्रतिनिधी | 2 |
| 9 | पेट्रोल/गॅस विक्रेत्यांचे प्रतिनिधी | 2 |
| 10 | शेतकऱ्यांचे प्रतिनिधी | 2 |
| 11 | एकुण | 28 |

अर्जाचा विहीत नमुना व पात्रतेबाबत निकष जिल्हा पुरवठा कार्यालय गडचिरोली येथे दिनांक२५.09.2023 पासुन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेस उपलब्ध करून देण्यात येईल. परीपुर्ण भरलेले अर्ज दिनांक २५.10.2023 पर्यंत जिल्हा पुरवठा कार्यालय गडचिरोली येथे कार्यालयीन वेळेपर्यंत स्विकारण्यात येईल.

जिल्हा पुरवठा अधिकारी
गडचिरोली.

फोटो

## परिशिष्ट-अ

राज्य ग्राहक संरक्षण परिषद / जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील नियुक्तीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना -

(१) संस्थेचे संपूर्ण नाव

(२) पूर्ण पत्ता

(३) संस्थेचा प्रतिनिधी म्हणून ज्या व्यक्तीस नामनिर्देशित करावयाचे आहे त्या व्यक्तीचे नाव व पत्ता-

दूरध्वनी क्रमांक :

भ्रमणध्वनी क्रमांक :

ईमेल :

(४) वय-

(५) शैक्षणिक अर्हता-

(६) व्यवसाय-

(७) प्रवर्ग-

(ज्या प्रर्गातून नियुक्ती हवी आहे तो प्रवर्ग नमूद करावा.)

(८) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे स्वरूप -

(९) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे कार्यक्षेत्र-

(१०) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचा कालावधी-

केव्हापासून -

केव्हापर्यन्त-

(११) किती ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यात आली व कोणत्या बाबीं बद्दल?

(१२) वरील कार्यामुळे किती ग्राहकांना नेमका कोणता फायदा प्रत्यक्षात झाला आहे?

(१३) वरील कार्यात उपलब्धीच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी व त्याकरिता मिळालेले पुरस्कार/ पारितोषिके, इ.

(१४) आपली निवड वरील परिषदेवर झाल्यास आपले काय योगदान राहील व कशाप्रकारे? (एका परिच्छेदात नमूद करावे)

(१५) सोबत जोडलेले पुरावे/कागदपत्रे.

---

मी श्री/श्रीमती -------------प्रमाणित करतो/करते की, अर्जात नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे. मी आणखी असे मान्य करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोट्या माहितीच्या आधारे मिळविलेली नियुक्ती रद्द होण्यास व फौजदारी कारवाईस मी पात्र राहीन. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहाणार नाही.

दिनांक-

स्थळ -

अर्जदाराची स्वाक्षरी

अर्जदाराचे नाव

## परिशिष्ट-ब

राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी इच्छूक व्यक्ती/संस्थांनी खालील प्रमाणपत्रे/कागदपत्रे जोडून अर्ज सादर करणे आवश्यक आहे:-

**(अ) अशासकीय संस्थेकडून नामनिर्देशित करावयाच्या प्रतिनिधींसाठी:-**

(१) विहित नमुन्यातील अर्ज.

(२) अर्जासोबत अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींसाठी शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या निकषांच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

(३) गैरवर्तणूकीसंबंधी संस्थेविरूध्द/पदाधिकाऱ्यांविरूध्द खटला दाखल होऊन शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

(४) शासनाने बंदी घातलेल्या संस्था/संघटना यांच्याशी संबंधित नसल्याबद्दल जिल्हा पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

(५) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत संस्थेची नोंदणी झाली असल्याचे प्रमाणपत्र व घटनेची प्रत.

(६) संस्थेचे ध्येय व उद्देश.

(७) संस्थेचे बँक बॅलन्स प्रमाणपत्र.

(८) संस्थेचा चालू वर्षाचा अर्थसंकल्प.

(९) संस्थेचे मागील तीन वर्षांचे ऑडिटेड स्टेटमेंट.

(१०) संस्थेने ज्या व्यक्तीची शिफारस केली आहे, त्या व्यक्तीचे संमतीपत्र.

**(ब) इतर अशासकीय सदस्यासाठी:-**

(१) विहित नमुन्यातील अर्ज.

(२) अर्जासोबत संबंधित व्यक्तीने ज्या प्रवर्गातील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीकरिता अर्ज केला आहे, त्यासाठी विहित केलेल्या निकषांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडाव्यात.

(३) गैरवर्तनासंबंधी खटला किंवा शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/ पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

* * *